# शासकीय तंत्रनिकेतन,पेण

शिवाजीनगर,रामवाडी,पेणजिल्हारायगड,पिन-४०२१०७

Email:gppen@dtemaharashtra.gov.in,principal.gppen@dtemaharashtra.gov.in

फोन : ९४०५६९१४०५, (०२१४३)२५३३८९,२५२३८३


शातपे/भांडार/निर्लेखन/दरपत्रक/२०२५/209

दिनांक : 14/08/2025

प्रति,

____________________________

____________________________

**विषयः** संस्थेतील निर्लेखित झालेले संगणक व इतर साहित्य विक्री करण्याकरीताच्या निविदा मागविण्याबाबत.

**संदर्भः** १) कार्यालयीन आदेश जा.क्रं. शातंपे/भांडार/निर्लेखन/२०२४-२५/179 दिनांक : 18/02/2025.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रं. ११/तंशिस/शातंनिपे/सा. निर्लेखन/२०२५/७८२ दिनांक: 29 /03/2025.

उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये शासकीय तंत्रनिकेतन पेण या संस्थेतील विविध विभागातील संदर्भ क्रमांक १ मधील अनुक्रमांक०१ ते २३ आणि संदर्भ क्रमांक२ मधील अनुक्रमांक१ ते ९, ४३, ४४, ४६ ते ४९ असे नादुरूस्त विनावापर अंदाजे १४१ संगणक, ४ प्रिंटर, ९ UPS आणि १ Scanner यांचे निर्लेखन करण्यात आलेले आहे ( संख्येत बदल होऊ शकतो) या साहित्यांची अंतिम विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीकोणातून मा. प्राचार्य, मा. संचालक यांनी त्यांच्या वित्तीय अधिकारात या संगणकांचे व नमुद साहित्य निर्लेखन करण्याचे वरील आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने उपरोक्त निर्लेखीत साहित्य विक्रीकरीता निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा सिलबंद लिफाफ्यात दि. 18/08/2025 ते 01/09/2025 रोजी, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात प्रत्यक्ष आणून दयाव्यात अथवा टपालाने पाठवाव्यात. उशिरा प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत. सदर निवदा दि. 03/09/2025 रोजी दु. १२.३० वाजता भांडार समिती समक्ष उपस्थित निविदाधारकांसमोर निविदा उघडण्यात येतील.

**<u>निविदा पाठविण्याची पध्दत</u>**

निविदा ही द्वि लिफाफा पदधतीने खालीलप्रमाणे देण्यात यावी.

**लिफाफा १ –** स्वतःच्या लेटरहेडवर लिहिलेले स्वाक्षरी केलेले दरपत्रक खालील तक्त्यात देण्यात यावे.

| अनुक्रमांक | वस्तू | दर (रू.) प्रती नग |
|---|---|---|
| १ | संगणक(संबधित भाग) | |
| २ | प्रिंटर | |
| ३ | UPS | |
| ४ | Scanner | |

Scanned with OKEN Scanner

**लिफाफा २ –** अनामत रक्कम म्हणून रू. १०,०००/– (रू. दहा हजार मात्र) चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष, निर्लेखन संगणक स्वतः बघूनच दर देण्यात येत असल्याबाबतचे आणि सर्व अटी शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र (दिलेल्या प्रपत्रात), निविदा धारकाचे आधारकार्ड, पॅन कार्ड, निविदाधारकाचा परवाना, GST नंबर (असेल तर)

सदरचे दोन लिफाफे (लिफाफा १ आणि लिफाफा २ असे मनुद करून) एका मोठया लिफाफ्यात घालून मोठा लिफाफा सिलबंद करून लिफाफ्यावर **"निर्लेखन संगणक खरेदी दरपत्रक"** असे ठळक अक्षराने लिहावे.

<u>अटी व शर्थी</u>

१) निविदाधारकाने दि. 18/08/2025 ते 01/09/2025 पर्यंत कार्यालयीन दिवस सकळी ११.०० ते संध्या. ४.०० वाजेपर्यंत संस्थेत येऊन निर्लेखन करण्यात आलेले संगणक व नमुद साहित्य संस्थेच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष पाहणी करून नंतरच संगणकाचे प्रती नग दर नोंदवावेत.

२) निविदा सादर करतांना रू. १०,०००/– (रू. दहा हजार मात्र) चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष **'प्राचार्य , शासकीय तंत्रनिकेतन पेण'** या नावाने लिफाफा २ मध्ये जोडावा.

३) निविदा मान्य केलेल्या ठेकेदारकास कार्यालयीन आदेश निर्गमित केल्यानंतर तात्काळ दोन कार्यालयीन दिवसांमध्ये साहित्य नेणे बंधनकारक राहिल. अन्यथा अनामत रक्कम रू. १००००/– जप्त करण्यात येईल आणि साहित्य दिले जाणार नाही.

४) ज्यांच्या निविदा स्विकारण्यात आल्या नाहीत त्यांच्या अनामत रक्कमेचे धनादेश पुढील ८ कार्यालयीन दिवसांमध्ये परत करण्यात येतील.

५) जास्तीत जास्त दर असलेल्या निविदाधारकास संगणक विकण्यात येईल. ज्या निविदा धारकांचे जास्तीत जास्त समान दर असल्यास त्या निविदा धारकांना तडजोडीसाठी बोलविले जाईल आणि जास्तीत जास्त दर मान्य करणाऱ्यास विक्री आदेश देण्यात येईल.

६) विक्री केल्यानंतर संस्थेस देण्यात येणारी रक्कम ही रोख स्वरूपात सामान ताब्यात घेण्यापुर्वी रोखपाल यांच्याकडे भरण्यात यावी. त्याची रितसर पावती निविदाधारकास रोखपालांकडून देण्यात येईल.

७) ठेकेदाराने खाली नमुद केलेले सर्व साहित्य हे शासकीय तंत्रनिकेतन,पेण रामवाडी, पेण येथून स्वतःच्या खर्चाने न्यावयाचे आहे. त्याची व्यवस्था ठेकेदाराने स्वतः करावयाची आहे.

८) निविदाधारकाने त्याची कागदपत्रे जसे आधार कार्ड, पॅन कार्ड, परवाना इ. निविदेसोबत पाठवावित.

९) निर्लेखन संगणक व नमुद साहित्य स्वतः बघूनच दर देण्यात येत असल्याबाबतचे आणि सर्व अटी शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र (दिलेल्या प्रपत्रात) दयावेत.

१०) उपरोक्त अटी शर्ती प्रमाणे निविदा नसल्यास, नमुद कागदपत्रे नसल्यास, नैसर्गिक आपत्ती / आणीबाणी सारखे प्रसंग उध्दभवल्यास कोणतेही कारण न देता निविदा अमान्य करणाचे किंवा निविदा प्रक्रीया थांबविण्याचे संपुर्ण अधिकार संस्थेचे प्राचार्य यांना आहेत.

डॉ. महेंद्र चितलांगे
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, पेण

Scanned with OKEN Scanner

# हमीपत्र

मी______________________________________ शासकीय तंत्रनिकेतन, पेण येथील निर्लेखन संगणक खरेदी करण्याकरीताच्या खालील अटी शर्ती मान्य आहेत. तसेच सर्व साहित्य स्वतः संस्थेत जावून पाहिल्यानंतरच दरपत्रकसादर करित आहे.

१) निविदाधारकाने संस्थेत येऊन निर्लेखन करण्यात आलेले संगणक संस्थेच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष पाहणी करून नंतरच संगणकाचे प्रती नग दर नोंदवित आहे.

२) निविदा सादर करतांना रू. १०,०००/– (रू. दहा हजार मात्र) चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष '**प्राचार्य , शासकीय तंत्रनिकेतन पेण**' या नावाने लिफाफा २ मध्ये जोडलेला आहे..

३) निविदा मान्य केलेल्या ठेकेदारकास कार्यालयीन आदेश निर्गमित केल्यानंतर तात्काळ दोन कार्यालयीन दिवसांमध्ये साहित्य नेणे बंधनकारक आहे. अन्यथा अनामत रक्कम रू. १००००/– जप्त करण्यात येईल आणि साहित्य दिले जाणार नाही याची मला जाणिव आहे.

४) ज्यांच्या निविदा स्विकारण्यात आल्या नाहीत त्यांच्या अनामत रक्कमेचे धनादेश पुढील ८ कार्यालयीन दिवसांमध्ये परत करण्यात येईल हे मला माहित आहे.

५) जास्तीत जास्त दर असलेल्या निविदाधारकास संगणक विकण्यात येईल. ज्या निविदा धारकांचे जास्तीत जास्त समान दर असल्यास त्या निविदा धारकांना तडजोडीसाठी बोलविले जाईल आणि जास्तीत जास्त दर मान्य करणाऱ्यास विक्री आदेश देण्यात येईल हे मला माहित आहे.

६) विक्री केल्यानंतर संस्थेस देण्यात येणारी रक्कम ही रोख स्वरूपात सामान ताब्यात घेण्यापुर्वी रोखपाल यांच्याकडे भरण्यात येईल.

७) ठेकेदाराने खाली नमुद केलेले सर्व साहित्य हे शासकीय तंत्रनिकेतन,पेण रामवाडी, पेण येथून स्वतःच्या खर्चाने नेणार आहे. त्याची व्यवस्था मी स्वतः करणार आहे.

८) निविदाधारकाने त्याची कागदपत्रे जसे आधार कार्ड, पॅन कार्ड, परवाना इ. निविदेसोबत जोडले आहे.

९) निर्लेखन संगणक स्वतः बघूनच दर देण्यात येत असल्याबाबतचे व सर्व अटी शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र (दिलेल्या प्रपत्रात) मी सादर करीत आहे.

१०) उपरोक्त अटी शर्ती प्रमाणे निविदा नसल्यास, नमुद कागदपत्रे नसल्यास, नैसर्गिक आपत्ती / आणीबाणी सारखे प्रसंग उध्दभवल्यास कोणतेही कारण न देता निविदा अमान्य करणाचे किंवा निविदा प्रक्रीया थांबविण्याचे संपुर्ण अधिकार संस्थेचे प्राचार्य यांना आहेत हयाची जाणिव मला करून दिली आहे.

आपला विश्वासू,

Scanned with OKEN Scanner